REGISTERED No. B 3434.

डोंगरे यांच्या बालामृताने

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २९ आक्टोबर १९४७ अंक ४४

—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

—आमची वैशिष्टचें—

(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स तावडतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

—सुरवातीच्या—


अवघ्या ४ महिन्यांत कंपनीनें ५ लाखाचे वर काम मिळविलें.

## कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल विमा कंपनी लिमिटेड, मुंबई

या प्रगतिमान कंपनींत आपला विमा उतरून आपलें जीवन निर्वेध करा.

ठिकठिकाणीं अत्यंत सवलतीच्या अटीवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत. खालील पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा.

कृ. गो. परोपकारी
मॅनेजिंग डायरेक्टर
६५, सरस्वती विलास, लक्ष्मी रोड, पुणें २



## सारस्वत को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३०–९–१९४७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९७,९३० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,२१,१०० |
| ठेवी ... | रु. ७१,४१,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७९,२८,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

सब–ऑफिस :
—दादर—
(बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्.
चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्.
सेक्रेटरी

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# विविध माहिती

**पाकिस्तानसाठी पेनिसिलीन**—कॅनडाच्या सरकारनें पाकिस्तान सरकारला ९ कोटी, ४० लाख युनिटस् पेनिसिलीन देणगीदाखल दिलें आहे. हें महत्वाचे औषध लवकरच विमानानें पश्चिम पंजाबामध्यें पोंचविण्यांत येणार आहे असें समजतें. पश्चिम पंजाबमधील हत्याकांडामुळें जी रोगराई उत्पन्न झाली आहे तिला आळा घालण्यासाठीं ह्या औषधाचा चांगला उपयोग होईल.

**हिंदी निर्वासितांना अमेरिकन मदत**—अमेरिकेंतील अनेक संस्थांनीं मिळून एक कमिटी स्थापन केली आहे. हिंदुस्थानांतील निर्वासितांना अन्न, दुध व वैद्यकीय मदत इत्यादींचा पुरवठा करण्याचा ह्या कमिटीचा हेतु आहे.

**जर्मनींत क्षयरोगाचा सुळसुळाट**—जर्मनीच्या ब्रिटननें व्यापलेल्या भागांत सुमारें १० लाख लोकांना क्षयरोग जडला असल्याची बातमी जर्मन डॉक्टरांच्या परिषदेंत जाहीर करण्यांत आली.

**हैद्राबाद संस्थानांतील हरिजन**—हरिजनांच्या उद्धारासाठीं निजाम सरकारनें एक कोटी रुपयांचा फंड मंजूर केला आहे. ह्या फंडाचा एक ट्रस्ट करण्यांत येणार असून त्याची व्यवस्था सरकारी व बिनसरकारी सभासदांच्या हातीं राहणार आहे.

**ऑस्ट्रेलिआंतील गव्हाचें पीक**—ऑस्ट्रेलिआंतील यंदाच्या गव्हाच्या पिकाचा अंदाज २३ कोटी बुशेल्स इतका करण्यांत आला आहे. हें पिक कापून हातांत पडण्यासाठी दुकानांतून काम करणारे व कारकून ह्यांच्या तुकड्या मुद्दाम तयार करण्यांत आल्या आहेत. गव्हाच्या ह्या पिकासंबंधीं न्यू साऊथ वेल्सच्या शेतकी खात्याच्या मंत्र्यानें असे उद्गार काढले, कीं ऑस्ट्रेलिआवर गव्हाचा पाऊस पडण्याइतकें अमाप पीक यंदा आलें आहे.

**पाकिस्तानचें औद्योगीकरण**—सिंध प्रांतिक मुस्लीम लीगचे अध्यक्ष श्री. युसुफ हरुन ह्यांनी लंडनमध्यें वृत्तपत्रकारांना एक मुलाखत दिली. त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, पाकिस्तान सरकार औद्योगीकरणाचा एक सप्तवार्षिक कार्यक्रम आंखणार आहे. त्यासाठीं उद्योगपतींची एक परिषद सरकार लवकरच भरविणार आहे. पाकिस्तान मधील कापडाचें उत्पादन वाढविण्याची योजना हातीं घेण्यांत आली आहे. रासायनिक धंद्यांनाही पाकिस्तानांत क्षेत्र आहे. पाकिस्तानांत कोळसाही सांपडेल, परंतु सगळ्यांत जास्ती आशा तेलासंबंधीं आहे.

**सिंधूवरील नवें धरण**—सिंधचें सरकार सिंधू नदीच्या मुखाकडील धरण लवकर पूर्ण करण्याचा विचार करीत आहे. त्यासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रीसाठी व तज्ञांच्या मदतीसाठी परदेशी कंपन्यांशी वाटाघाटीही चालू करण्यांत आल्या आहेत. धरण पूर्ण झाल्यावर २५ लाख एकर जमीन पाटाखालीं येईल असा अंदाज आहे.

**आसामला जोडणारी नवी रेल्वे**—आसामचे मुख्य प्रधान, बंगालचे अर्थमंत्रि आणि हिंदी सरकारचें वहातुक खातें ह्यांच्या संयुक्त परिषदेंत, किसन गंज येथून आसामकडे जाणारी एक रेल्वे बांधण्याचें ठरलें आहे असें समजतें. ह्या रेल्वेची लांबी २०० मैल होईल आणि खर्च ४॥ कोटी रुपये येईल. रेल्वे मीटर गेजची बांधण्यांत येणार आहे.

**मद्रास प्रांतांत साखरेचे नवीन कारखाने**—मद्रास सरकारनें प्रांतांत साखरेचे नवीन ९ कारखाने काढण्याची परवानगी दिली आहे. मद्रास प्रांतांत १४ साखरेचे कारखाने चालू असून ते सर्व मिळून दरवर्षी १४ हजार टन ऊस गाळूं शकतात.

**कर चुकविणाऱ्यांची चौकशी**—गेल्या एप्रिलमध्यें मध्यवर्ती विधिमंडळानें मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणें, प्राप्तीवरील कर चुकविणाऱ्या व्यक्ती अगर संस्था ह्यांची चौकशी करण्यासाठी हिंदी सरकार एक कमिशन नेमणार आहे, असें समजतें. प्राप्तीवरील कराचा सध्याच्या कायदा कराची आकारणी चुकवितां न येण्याच्या दृष्टीनें कितपत कार्यक्षम आहे यासंबंधींही कमिशनने अहवाल करावयाचा आहे. फेडरल कोर्टाचे एक माजी न्यायाधीश श्री. वरदाचारिअर ह्यांची कमिशनच्या अध्यक्षपदीं नेमणूक होणार आहे.

**कामगारांच्या सुखासाठी कायदा**—सध्याच्या फॅक्टरी ॲक्टाचा फायदा न मिळणाऱ्या कामगारांचे हितसंबंध रक्षण केले जावेत आणि त्यांना कांहीं किमान सोयी मिळाव्या म्हणून हिंदी घटना समितींत म्हणजे मध्यवर्ती विधिमंडळांत एक बिल मांडण्यांत येणार आहे. ह्या बिलान्वयें सध्याच्या कायद्याची व्याप्ती वाढविण्यांत येणार असून कांहीं विशिष्ट प्रकारच्या कारखान्यांसाठी वेगवेगळीं कलमेंही घालण्यांत येणार आहेत. विड्यांचे कारखाने, काथ्याचे कारखाने, चिनीमातीच्या भांड्याचे कारखाने आणि कातड्याचे कारखानेही बिलाच्या कक्षेंत येणार आहेत.

**नागपूरला रेडीओ केंद्र**—मध्यप्रांत सरकारचे एक मंत्री श्री. मिश्रा ह्यांच्या प्रयत्नानें नागपूर येथें एक ध्वनिक्षेपण केंद्र लवकरच स्थापण्यांत येणार आहे असें समजते. दिल्लीच्या मध्यवर्ती केंद्राहून कांहीं तज्ज्ञ जरूर ती व्यवस्था करण्यासाठी नागपूरला येणार आहेत.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें:-

देणगीदारांस कारभारी मंडळावर प्रतिनिधित्व

या संस्थेच्या नवीन कायद्या-अन्वयें संस्थेस देणगी देणारांस संग्रहालय संस्थेच्या कारभारी मंडळावर प्रतिनिधित्व देण्यांत आलेलें आहे. देणग्या रु. ५,००० पेट्रन, ५००, लाइफ मेंबर रु, ३००, डोनर, व सामान्य सभासद रु. १० तीन वर्षें. असें देणगीचे दर ठरविण्यांत आले आहेत. रु. ३०० ते रु. ५००, रु. ५०० ते रु. ५००० पर्यंत व रु. ५००० चे पुढें हवी तितकी देणगी देतां येतें. या कलमाअन्वयें देणग्या स्वीकारण्यास सुरुवात झालेली आहे व सुमारें एक दोन महिन्याच्या नंतर देणगीदारांची निवडणूक करावयाची आहे. देणग्या मागण्यासाठीं खाजगी विनंती करण्यांत येत आहे. परंतु हें निमंत्रण कोणास न मिळालें असें कळविल्यास त्यांना माहिती पुरविण्यांत येईल. देणगीदारांचे या कलमाप्रमाणें नवीन रजिस्टरहि तयार होत आहे. त्या बाबतींतहि कोणास कांहीं माहिती हवी असल्यास संस्थेच्या कचेरींतून मिळेल.

संग्रहालय कचेरी,
पुणें २. दि. २६।१०।४७.

भा. वि. घारपुरे
क्यूरेटर,
लॉ. रेम. औद्योगिक संग्रहालय.


आजच वर्गणीदार व्हा !

**व्यापार-उद्योग**

महाराष्ट्राचे व्यापारविषयक प्रमुख मासिक

दुसरा अंक १ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होणार.

वा. वर्गणी १० रुपये — किरकोळ अंक एक रुपया

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणे आहेत. जाहिरातीकरितां चौकशी करा.

लिहा: मोहाडीकर बंधु, व्यवस्थापक

१० गंगानिवास, रानडेरोड, दादर, मुंबई १४.

# अर्थ

बुधवार, ता. २९ आक्टोबर, १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.




प्रो. वा. गो. काळे

## लॉर्डांच्या सभागृहाच्या हक्काला मर्यादा

ब्रिटनमधील कायदे मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या एका महत्त्वाच्या हक्काला मर्यादा घालण्याच्या कायद्याचें बिल मजूर मंत्रिमंडळानें कनिष्ठ सभागृहाला सादर करण्याचें ठरविलें आहे. ह्या नव्या व क्रांतिकारी बिलाची सूचना पार्लमेंटचें उद्घाटन करतांना राजेसाहेबांनीं केलेल्या भाषणांत दिली आहे. ब्रिटिश राज्यसंस्थेंत कनिष्ठ विधिमंडळ आणि वरिष्ठ विधिमंडळ ह्यांचेमधील सध्याचे संबंध १९११ च्या पार्लमेंट अॅक्टप्रमाणें ठरविले गेलेले आहेत. ह्या कायद्यान्वयें, कनिष्ठ सभागृहाच्या अध्यक्षानें एखादा कायदा जर आर्थिक विषयासंबंधींचा आहे असा हवाला दिला, तर त्या कायद्याला वरिष्ठ सभागृहाला अडथळा करतां येत नाहीं. परंतु इतर कायद्यांच्या बाबतींत मात्र असे कायदे मंजूर करण्याचे दोन वर्षेपर्यंत लांबविण्याचा हक्क वरिष्ठ सभागृहाला आहे. सध्यां ब्रिटनमधील लोखंडाच्या व पोलादाच्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याला हुजूर पक्षाकडून जोराचा विरोध होत आहे. १९४५ च्या मध्याला मजूर पक्ष इंग्लंडमध्यें सत्तारूढ झाला तेव्हांपासून महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा आपला निवडणुकीचा कार्यक्रम तो हळुहळु अंमलांत आणीत आहे. आतां मजूर पक्षाच्या कारभाराला तिसरें वर्ष सुरू झालें असून १९४८ च्या प्रारंभीं लोखंडाच्या व पोलादाच्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें बिल मजूर पक्षातर्फे कनिष्ठ सभागृहापुढें मांडलें जाईल असा अंदाज आहे. अशा परिस्थितींत वरिष्ठ विधिमंडळाला वरील कायदा दोन वर्षे लोंबकळत ठेवण्याचा अधिकार असणें मजूर मंत्रिमंडळाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. कारण, तो तसा ठेवून पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत काळ काढण्याची संधी त्यामुळें वरिष्ठ सभागृहाला मिळणार आहे. म्हणून, वरिष्ठ सभागृहाच्या ह्या अधिकाराला मर्यादा घालण्याचें बिल कनिष्ठ सभागृहांत आणलें जाणार आहे.

मजूर मंत्रिमंडळाच्या ह्या धोरणावर अपेक्षेप्रमाणें हुकूमशाहीचा आरोप हुजूर पक्षाकडून करण्यांत येत आहे. पण ह्या आरोपांत कांहीं तथ्य नाहीं. मजूर मंत्रिमंडळ व पक्ष ज्या कार्यक्रमाच्या जोरावर पार्लमेंटमध्यें बहुमतानें निवडून आला तो कार्यक्रम पार पाडण्याच्या दृष्टीनें जरूर ते घटनात्मक फेरफार सनदशीर मार्गानें करण्याचा पूर्ण हक्क त्याला आहे. युद्धानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत ब्रिटिश मतदारांनीं दिलेला निर्णयच मजूर मंत्रिमंडळ कृतींत आणीत आहे. अशा परिस्थितींत वरिष्ठ विधिमंडळ आपल्या हक्काचा दुरुपयोग करून मतदारांचा निर्णय धाब्यावर बसविण्याची कारवाई करील असा दाट संभव निर्माण झाला आहे. तेव्हां मजूर मंत्रिमंडळाकडून अशा प्रकारचे लॉर्डांच्या हक्कांना मर्यादा घालणारें बिल बहुसंख्य ब्रिटिश मतदारांच अपेक्षित असतील असें म्हणण्यास हरकत नाहीं.

लॉर्डांच्या सभेचे अधिकार कमी करण्याच्या प्रश्नाचा उल्लेख मजूर पक्षाच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत नव्हता, तेव्हां हा प्रश्न हातीं घेण्यासाठी मजूर सरकारास जनतेनें स्पष्ट आदेश दिलेला नाहीं, असें सरकारविरोधी पक्षाचें म्हणणें आहे. गेल्या दोन वर्षांत लॉर्डांच्या सभेनें मजूर पक्षाच्या कार्यक्रमास निष्कारण अडथळा केलेला नाहीं, उलट कांहीं बाबतींत लॉर्डांच्या सभेंतील चर्चा व तिचे निर्णय उपकारकच झालेले आहेत, असेंहि सांगण्यांत येत आहे. ब्रिटनची आर्थिक परिस्थिति इतकी बिकट असतांना हें नवें क्रांतिकारक बिल मांडण्यांत सरकार जनतेची दिशाभूल करीत आहे, असाहि आरोप मजूर सरकारावर होत आहे. आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं व ती मजूर पक्षाच्या कार्यक्रमास अनुसरून मजबूत आणि स्थाई पायावर आधारण्यासाठींच ही उपाययोजना केली जात आहे हेंच त्या टीकेस मजूर सरकारचें उत्तर आहे.

## हिंदी बनावटीच्या मालाचा दर्जा

हिंदी औद्योगिक मालाचा दर्जा चांगला राखण्याच्या प्रश्नाचा विचार करणाऱ्या इंडिअन स्टॅन्डर्ड्स इन्स्टिट्यूशनच्या कार्यकारी मंडळाची बैठक ता. १५ ऑक्टोबर रोजीं झाली. परिषदेला उद्देशून हिंदी संघराज्याचे उद्योग व पुरवठा मंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांचें भाषण झालें. ह्या संस्थेशीं बऱ्याच उद्योगपतींनीं सहकार्य केल्याबद्दल श्री. मुकर्जी ह्यांनीं समाधान व्यक्त केलें. कारण, केवळ सरकारी मदतीवर अवलंबून राहिल्यानें संस्थेचें काम मंद गतीनें चालणार हें उघड आहे. संस्थेच्या टेक्स्टाइल विभागानें आपलें काम चालू केलेंच आहे. स्थापत्यशास्त्रांतील बरेच विभाग एका दर्जाच्या पातळीवर आणण्याचें ठरलें असल्यामुळें एंजिनिअरिंग विभागानें आपलें कार्य तांतडीनें सुरू करावें अशी सूचना मंडळानें केली आहे. संस्थेच्या संचालकानें दशमान पद्धतीवर आधारलेली नवीन नाण्यांची आणि वजनामापाची मेट्रिक पद्धत चालू करण्याबद्दल हिंदी सरकारला सूचना केल्याच आहेत. ह्याच सूचना पुन्हां सरकारकडे पाठविण्याचें मंडळानें ठरविलें. डॉ. ह्युहर्ट हे अमेरिकन तज्ञ संस्थेच्या व इंडिअन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटच्या आमंत्रणावरून हिंदुस्थानांत येणार आहेत. औद्योगिक मालाच्या दर्जाविषयीं त्यांचा अधिकार मोठा आहे. हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या उद्योगधंद्यांच्या केंद्रांना भेट देऊन हिंदी औद्योगिक मालाचा दर्जा चांगला राखण्याबद्दल कशी संघटना करावी ह्याबद्दल ते शिफारशी करणार आहेत. इंडिअन स्टॅंडर्ड्स इन्स्टिट्यूशन ही अशाच आंतरराष्ट्रीय संघटनेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर हिंदुस्थानचें प्रतिनिधित्व करीत आहे. समान दर्जा राखण्यासाठीं आंतरराष्ट्रीय संघटनेनें एकंदर ६७ विषय सुचविले आहेत, त्यांतील हिंदी उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या २७ विषयांत संस्था भाग घेणार आहे. ह्या विषयांत इमारती, कापडाच्या गिरण्या, लांकूड, औद्योगिक तेलें, यांत्रिक हत्यारें, लोखंड व पोलाद, जळणें, शेतकीचीं अवजारें, रंग व रोगणें इत्यादि प्रमुख आहेत. १९४८ मध्यें इंग्लंडमध्यें कापडधंद्याच्या आंतरराष्ट्रीय कमिटीची बैठक होणार आहे. ह्या बैठकीला आपलें प्रतिनिधी-मंडळ धाडण्याचें कार्यकारी मंडळानें ठरविलें आहे.

## सारस्वत को ऑपरेटिव्ह बँकेची वार्षिक सभा

अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचें भाषण

बँकेच्या २९ व्या वार्षिक साधारण सभेंत श्री. वर्दे ह्यांनीं प्रचलित आर्थिक परिस्थितीविषयीं काढलेल्या महत्त्वाच्या उद्गारांचा आशय पुढें दिला आहे:—

भाषणाच्या आरंभीं श्री. वर्दे ह्यांनीं देशांत आर्थिक स्थैर्य टिकविणें आणि बहुसंख्य जनतेचें रहाणीचें मान वाढविणें, हीं दोन आजचीं प्रधान कार्यें असल्याचा उल्लेख केला. देशांतील ज़ातीय दंग्यांचा ह्या कामीं कसा अडथळा येत आहे तें सांगून श्री. वर्दे म्हणाले, " ह्या वर्षीं आर्थिक परिस्थिति अधिकच बिघडली आहे. जीवनाच्या प्राथमिक गरजेच्या वस्तू म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची जागा. पण, त्यासुद्धा पूर्वीं कधींही नव्हत्या इतक्या दुर्मिळ होऊन बसल्या आहेत. त्यामुळें आपणांसारख्या मध्यम वर्गीय लोकांची मोठीच कुचंबणा होत आहे. आर्थिक जीवनाची घडी विस्कटल्यामुळें बेकारी हळूहळू वाढत आहे. उत्पादनांत भाग घेणाऱ्या दोन प्रमुख घटकांत तीव्र भेद माजून राहिल्यामुळें उत्पादन घटत चाललें आहे. त्यामुळें अर्थातच देशांतील पैशाच्या व्यवहारावर आणि सरकारच्या अंदाजपत्रकावर अनिष्ट परिणाम घडून येत आहेत. पुढील वर्षीं आपण अधिक चांगले दिवस पाहूं अशी आशा करूं या. परंतु असें होण्यांत बऱ्याच अडचणी आहेत. युद्ध चालू होतें त्यावेळीं युरोप आणि अमेरिका हीं ज्या सहकार्याच्या वृत्तीनें वागत होतीं, ती वृत्ती आतां नाहींशी झाली ही दुःखाची गोष्ट होय. त्याऐवजीं आतां एकमेकाविरुद्ध कट आणि स्पर्धा ह्यांचें राज्य सुरू झालें आहे. युरोपांतील राष्ट्रांना डॉलर्सचा तुटवडा पडल्यामुळें त्यांनीं जरूर असणारी आयात बंद करून स्वतःचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ह्या उत्पादन वाढीला योग्य दिशा लावली नाहीं, तर १९२९ च्या आर्थिक अरिष्टाची पुनरावृत्ति होईल.

" सध्या अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे कीं, प्रत्येकानें— मग ती व्यक्ति असो कीं संस्था असो—आपली आहे ती आर्थिक परिस्थिति बळकट करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. पैशाच्या बाजाराची परिस्थिति फारशी समाधानकारक नाहीं. सरकार स्वस्त पैशाचें धोरण टिकवून धरण्याचे प्रयत्न करीत आहे. सरकारी कर्जरोख्यांचे भाव चढते राहण्याचे दिवस संपले आहेत. मालाच्या तारणावर कर्जें देण्यांतील धोका अधिक वाढला आहे; त्यामुळें बँकांना आपले व्यवहार पूर्वींपेक्षा अधिक दक्षतेनें करावे लागत आहेत. औद्योगिक कंपन्यांच्या भागांत पैसे गुंतविणें जास्त जबाबदारीचें झालें आहे. अशा परिस्थितींत मध्यम वर्गानें आपला पैसा भांडवलाच्या सुरक्षिततेवर नजर ठेऊन गुंतवावा; मग ह्या भांडवलावर नफा कमी मिळाला तरी चालेल. "

## " अर्था " चा दिवाळी अंक

" अर्था " चा ता. १२ नोव्हेंबर, १९४७ चा अंक हा मोठा दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध होईल आणि त्यानंतरचा नेहमीचा अंक ता. ३ डिसेंबर रोजीं निघेल.

## मुठा कालव्याचें पाणी घेणाऱ्या शेतकऱ्यांची मागणी

( लेखक:—श्री. के. बी. भागवत, बी. एजी. )

पूर्वीं मुठा कालव्याच्या पाझराच्या पाण्यावर ५०० एकरांपेक्षा अधिक ऊंस लावण्याची परवानगी असे. आतां पाझरांना कालवे मानण्यांत येत असून त्यांच्या पाण्यावर ऊंस लावण्याची बंदी करण्यांत आली आहे. " नोटिफाइड रिव्हर्स " ह्याहि कालवे मानण्यांत येऊन त्यांच्या पाण्यावर पूर्वीं ऊंस लावण्यास बंदी असे. पण आतां ह्या पाण्यावर ऊंस १ एकर लावला तर अन्नधान्य ४ एकर लावण्याच्या अटीवर ऊंस लावण्याची परवानगी मिळाली आहे. मुठा कालव्याच्या पाण्यावर गेलीं आठ वर्षें ऊंस लावण्याची बंदी करण्यांत आली आहे. ह्याला कारण पाण्याची टंचाई, हें दाखविण्यांत आलें आहे. कालव्याच्या पाझरावर सरकारी खातें कांहीं खर्च करीत नाहीं; असें असतांना पाझराच्या पाण्यावर ऊंस लावण्यास बंदी कां असावी हें समजत नाहीं. म्हणून आमची अशी सूचना आहे कीं, " नोटिफाइड रिव्हर्स " च्या पाण्यावर ज्या प्रमाणें ऊंस लावण्याची परवानगी देण्यांत आली आहे, त्याचप्रमाणें पाझराच्या पाण्यावरही तो लावण्याला हरकत असूं नये.

कालव्याच्या पाण्यावर ऊंस लावण्याची परवानगी नसली तरी भाजीपाला लावण्यास हरकत नाहीं. सुमारें २ हजार एकरांपर्यंत भाजीपाला लावतां येतो. पण भाजीपाल्यांचे बाजारभाव फार कमी जास्त होतात. दुसरें असें कीं, भाजीपाल्यांपैकीं ६० टक्के भाजीपाला चांगला होतच नाहीं. कारण, त्यावर कीड पडते अगर त्याला रोगाची भावना होते. कोबी, फुलावर आणि नोलकोल ह्यांचीं बियाणें तर किडीला फार संवेदनक्षम असतात. त्यामुळें पुष्कळदां बियाणें तयार करण्यासाठीं दोनदां किंवा तीनदाहि बीं पेरावें लागतें. ह्या भाजीपाल्याचें बीं फार महाग असतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणून ज्या प्रमाणांत भाजीपाल्याला परवानगी आहे, त्याच प्रमाणांत उसालाही परवानगी देण्यांत यावी. आमच्या मतें, मुठा राइट बँक कालव्यावर १५०० एकर ऊंस लावण्यास हरकत नसावी. सध्याच्या अन्नधान्याच्या टंचाईच्या दिवसांत प्रत्येक शेतकऱ्यानें अन्नधान्याचें महत्व ओळखून त्या पिकांची लागवड अवश्यमेव केली पाहिजे हें खरें, पण आमचा कटु अनुभव असा आहे कीं, मुठा कालव्याच्या पाण्यावर अन्नधान्याची लागवड करणें आर्थिक दृष्ट्या परवडत नाहीं. सरकारच्या पाणी—पुरवठा खात्यानें ह्या गोष्टीचा विचार करणें जरूर आहे. दुसरें असें कीं, कालव्याच्या पाण्यावर एक वर्ष ऊंस लावून पुढील दोन वर्षें अन्नधान्याची लागवड केली तर पीकही चांगलें येतें आणि त्यासाठीं पेंडेचें खत फारसें घालावें न लागतां उसाच्या लागवडीला घातलेल्या उर्वरित खतावरच हें पीक येतें. कालव्याच्या भागांतील पाण्याची पातळी बरीच वाढल्यामुळें, त्या भागांत विशेषतः जुलै ते डिसेंबर पर्यंत भाजीपाला चांगला होत नाहीं. ऊंस मात्र चांगला होतो. उसाचें पीक काढल्यावर त्या शेतांतून भाजीपाला लावला तर उसाला घातलेल्या खतावरच तो चांगला पोसला जातो. आमची अशी विनंति आहे कीं, मुठा कालव्यावर ज्या ठिकाणीं भाजीपाला लावण्याची परवानगी आहे, त्या ठिकाणीं त्याऐवजीं ऊंस लावण्याची परवानगी द्यावी. निदान १५०० एकर ऊंस लावण्याची तरी परवानगी असावी.

## हिंदचा तागाचा धंदा व त्याचें भवितव्य

तागाच्या गिरण्यांची संख्या हिंदुस्थानांत सुमारें १०० असून त्या सर्व गिरण्या हिंद सरकारच्या क्षेत्रांत येतात. पाकिस्तानांत एकहि गिरणी नाहीं. परंतु तागाच्या पिकाच्या लागवडीच्या बाबतींत मात्र परिस्थिति भिन्न आहे. कारण पाकिस्तानमध्यें तागाच्या लागवडीचें ७१ टक्के क्षेत्र येतें, तर हिंदच्या क्षेत्रांत २९ टक्के लागवड आहे व पश्चिम बंगालमध्यें फक्त यापैकीं १० टक्के लागवड आहे. कच्च्या मालाच्या लागवडीच्या क्षेत्रांतील ही विषमता तागाच्या धंद्याच्या सद्यःस्थितीच्या व भवितव्याच्या दृष्टीनें चिंतनीय दिसते. कारण, आजच्या प्रमाणांत तागाच्या पक्क्या मालाचें उत्पादन व्हावयाचें असल्यास कच्च्या तागाच्या पुरवठ्यासाठीं पाकिस्तानवरच अवलंबून रहावें लागणार आहे. १९४६ च्या आकड्याप्रमाणें पाकिस्तानचें तागाच्या लागवडीचें क्षेत्र १३,२७,२५५ एकर होतें तर हिंदी संघराज्याचें तेंच क्षेत्र ५,५२,७५४ एकर होतें.

तागाच्या गिरण्यांत सुमारें ३० कोटी रुपये भांडवल गुंतविलें गेलें आहे व यापैकीं अजून बराचसा भाग परकी मालकीचा आहे. १८७० नंतर तागाच्या गिरण्या बंगालमध्यें परकी भांडवलानें हळू हळू स्थिरस्थावर झाल्या व या धंद्याची सावकाश पण निश्चितपणें प्रगति होत गेली. दोन महायुद्धांच्या काळांत तागाच्या मालाला विशेष मागणी असल्यामुळें धंदा तेजींत होता. सुरवातीला कित्येक वर्षे भांडवल व सूत्रें सर्वस्वीं परकी कारखानदारांच्या हातांत होती, परंतु गेल्या कांहीं वर्षांत या धंद्याचा कांहीं भाग हिंदी भांडवलाच्या हातीं आला आहे. तागाच्या गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या सुमारें चार लक्ष असावी. तागाच्या गिरण्यांना १९२८ सालीं सात कोटी, त्रेसष्ट लक्ष नफा झाला, व १९४० सालीं पावणेचार कोटी रुपये नफा झाला. जागतिक मंदीच्या काळांत नफ्याची रकम एक कोटीहूनहि कमी होत असे.

तागाच्या बाबतींत हिंदुस्थानला जागतिक मक्तेगिरीचा फायदा मिळत असल्यामुळें आपल्या अर्थव्यवस्थेंत ह्या धंद्याचें स्थान अजूनपर्यंत एक प्रकारें शाश्वतीचें व विलोभनीय होतें. कारण, आपल्या परराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें एकंदर निर्गत व्यापारापैकीं सुमारें ३१ टक्के निर्गत पक्का व कच्चा ताग या स्वरूपाची १९३९–४० सालीं होती. आपल्याला परदेशांतून पक्का माल आयात करावयास लागणारी क्रयशक्ति तागाच्या निर्यातीमुळें निर्माण होऊं शकते ही गोष्ट स्पष्ट आहे. तेव्हां ही परिस्थिति कशी टिकवितां येईल हा आज महत्त्वाचा प्रश्न आहे.

पाकिस्ताननें स्वतःचे कारखाने काढावयाचें ठरविलें आहे व त्याप्रमाणें कांहीं कारखान्यांच्या योजनाहि तयार आहेत. पाकिस्तानजवळ कच्चा ताग भरपूर असल्यामुळें तागाच्या गिरण्या काढण्याचें त्या सरकारनें सुरू करण्याचें ठरविलें आहे. उलट हिंदी संघराज्याला यांच्यापुढें पश्चिम बंगालमधील तागाच्या गिरण्या चालविण्यासाठीं पाकिस्तानवर कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठीं अवलंबून राहावें लागणार आहे. कच्च्या मालाचा पुरवठा पाकिस्ताननें नेहमीप्रमाणें केला तरच आपले तागाचे कारखाने चालूं शकतील. पुरवठा करतांना किंमतीचा प्रश्न निर्माण होईल व पाकिस्ताननें योग्य किंवा न्याय्य किंमत आकारली तरच हा प्रश्न सलोख्यानें सुटेल. आणखी एक अडचण म्हणजे दोनहि देशांतील मालाच्या जकातीबद्दलचें धोरण. पाकिस्ताननें हिंदी संघराज्यांत खपणाऱ्या कच्च्या तागाच्या निर्यातीवर जकात लादली तर तेवढ्या प्रमाणांत आपल्या कारखानदारांना ताग महाग पडेल. या दोन अडचणी दोनहि देशांत परस्पर सलोख्याचे व्यापारी संबंध राहातील तरच दूर होणाऱ्या आहेत. तेव्हां हिंद सरकारनें पाकिस्तानशीं या बाबतींत मुदतीचा करार शक्य तर करावा हें योग्य ठरेल.

कच्च्या तागाच्या लागवडीचें हिंदी संघराज्यांतील क्षेत्र वाढवून, पाकिस्तानवर पुरवठ्यासाठीं अवलंबून राहाण्याची अपरिहार्यता सुधारतां येईल का हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. परंतु देशांतील गेल्या तीन वर्षांतील बिकट अन्न परिस्थिति लक्षांत घेतां हिंदी संघराज्याला तागाच्या लागवडीचें क्षेत्र वाढवितां येईल अशी फारशी आशा वाटत नाहीं. कमींत कमी सध्यां पांच वर्षे तरी सर्व परिस्थिति पूर्णपणें आटोक्यांत येईपर्यंत लागवडीचें क्षेत्र वाढवितां येणार नाहीं व नंतरहि दरम्यानच्या पांच वर्षांच्या काळांत आपली आर्थिक परिस्थिति औद्योगिक व कृषिविषयक उत्पादनाच्या दृष्टीनें बरीचशी सुधारली तरच तागाच्या लागवडीच्या वाढीचा विचार करतां येईल. परंतु याहि बाबतींत भौगोलिक अडचणी आहेत. कारण, कच्च्या तागाला आवश्यक अशी जमीन, भरपूर पाणी व हवामान यांची विशेषशी अनुकूलता हिंदी संघराज्यांत नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं, तागाच्या धंद्याची आजची परिस्थिति यापुढें टिकवून धरणें फार कठीण जाणार आहे.

पाकिस्तानमध्यें परकी भांडवल, परकी तज्ज्ञांचा सल्ला व प्रत्यक्ष मार्गदर्शन, दक्षिण आफ्रिकेकडून पाकिस्तानांत होणारी कोळशाची आयात, हवाई वहातुकीच्या बाबतींत इंग्लिश मंत्रिमंडळांतील प्रमुखांची पाकिस्तानशीं वाटाघाटी, पाकिस्तानच्या मदतीला असणारे परकी जमाबंदीचे प्रश्न जाणणारे तज्ज्ञ इ. अगदी गेल्या एक दोन महिन्यांतील घटना विचारांत घेतल्या म्हणजे असें दिसून येतें कीं, पाकिस्तान आपलें औद्योगिकरण अल्प प्रमाणांत तरी निश्चितपणें करूं शकेल. मात्र हिंदी संघराज्यांतील परिस्थिति अजून फारशी आशाजनक दिसत नाहीं. निदान आहे ती परिस्थिति टिकवून धरणें ही गोष्टही फार कठीण आहे. तागाच्या धंद्याशीं निगडीत असलेले शेतकरी, कारखानदार, व्यापारी, सरकारी तिजोरी, मजूर या सर्वांचे संबंध लक्षांत घेतले, व त्याचबरोबर सध्यां आपणाला अत्यंत आवश्यक असलेल्या, परदेशांतील क्रयशक्तीचा विचार केला म्हणजे या धंद्याची परिस्थिति किती नाजुक झाली आहे याची कल्पना येते. आपलें आर्थिक जीवन निदान टिकवून धरण्याची सध्यां विशेष आवश्यकता आहे. हिंद सरकारनें ह्या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन तागाच्या गिरण्यांच्या बाबतींत व ताग पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतींत मार्गदर्शन करावें. ह्या महत्त्वाच्या धंद्याची परिस्थिति चांगली राहिल्यास आपल्या नाजुक आर्थिक जीवनाला एक भक्कम आधार मिळणार आहे. भांडवलाचें पूर्ण हिंदीकरण व गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचे कारखाने काढणें हेहि प्रश्न विचारांत घेतले पाहिजेत.

---

बाल्कन्स देशांचें महत्त्व—बल्गेरिआ, रूमेनिआ इत्यादि बाल्कन्स राष्ट्रांबद्दल लिहितांना 'हिंदुस्थान स्टँडर्ड' मध्यें एका लेखकानें पुढील विचार व्यक्त केला आहे. लेखक म्हणतो, "बाल्कन देशांतून भांडवलशाहीचें उच्चाटन होण्यानें युरोपमधील मक्तेदार भांडवलदारीचें क्षेत्र कमी झालें असून समाजवादी अर्थव्यवस्थेचें क्षेत्र वाढलें आहे. ह्यामुळें अर्थातच सोव्हिएट युनिअनचें वजन वाढलें आहे. ह्या घटनांची प्रतिक्रिया म्हणजेच ट्रूमन–तत्वाचा जन्म होय."

## दि स्टेट बँक ऑफ कुरुंदवाड (ज्यू.) लि.

### माधवपूर-वडगांव

भागिदारांकडे ताळेबंद व नफातोटापत्रक एवढेंच अवलोकनार्थ धाडण्याची प्रथा मोडून त्याबरोबर बँकेच्या कारभाराचा तपशीलवार वृत्तांत देण्यास मॅनेजिंग बोर्डानें प्रारंभ केला आहे, हें स्तुत्य आहे. १९३४ अखेरीशीं १९४६ अखेरीची तुलना करून प्रगतीची आकडेवार माहिती वृत्तांतांत देण्यांत आली आहे, तीवरून बँकेचें खेळतें भांडवल ३० हजारांवरून १० लाखांचे घरांत पोचल्याचें दिसून येतें. वसूल भांडवल ५५,०७० रु. असून राखीव व इतर निधी ३३ हजारांवर आहेत. बँकेचें मूळ मैंदर्गी येथील को. सोसायटीमध्यें होतें आणि तिचेंच धोरण बँकेनें पुढें चालविलें आहे. मध्यंतरीं तिनें कंट्रोल दुकानें चालविणेस घेऊन त्यांत सुमारें ३० हजार रु. नफा मिळविला. धान्य व्यवहारांतील नफ्याची रकम बँकेनें योग्य विनियोग होण्यासाठीं संस्थानाचे हातीं दिली आहे. १९४६ पासून बँकेनें व्यापाऱ्यांच्या सोईकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला, तो उपयुक्त व फायदेशीर ठरला आहे. कालमानाप्रमाणें बँकेच्या मुख्य कचेरीची सजावट व्यवस्थेशीर करण्यांत आली आहे. बँकेची व्यवस्था आजवर संस्थानचे एक अंमलदार पहात असत; आतां स्वतंत्र व्यवस्थापक नेमल्यानें बँकेच्या कामाचा उरक वाढण्यास मदत झाली आहे. ३१ डिसेंबर, १९४६ अखेरच्या वर्षी १६,६८३ रु. निवळ नफा झाला. रावसाहेब ए. व्ही. धारेश्वर, एम. ए., एलएल. बी., दिवाण, हे मॅनेजिंग बोर्डाचे अध्यक्ष असून मैंदर्गी येथील बोर्डाचे चेअरमन श्री जी. जे. पागे, बी. ए., एलएल. बी., मामलेदार, हे आहेत. श्री. गजानन डी. साठे, बी. ए, हे मॅनेजर आहेत.

## दि प्रोग्रेसिव्ह ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लि.

वरील संस्थेच्या केंद्र कचेरीचें उद्घाटन प्रिं. शं. वा. दांडेकर यांचे हस्तें ता. २४ ऑक्टोबर रोजीं झालें. कंपनीचा उद्देश शेतीचा धंदा करून पुढें साखर कारखाना काढणें हा आहे. कंपनीचे चेअरमन रावसाहेब डॉ. गुरुनाथ पुरुषोत्तम फडके, एम. बी. बी. एस, डी.पी. एच., आरोग्याधिकारी, पंढरपूर, हे असून मॅनेजिंग एजन्सी कुलकर्णी देशमाने आणि कं. (श्री. द. ल. देशमाने व्यापारी, पंढरपूर व श्री. रा. तु. कुलकर्णी, बी. एससी. पुणें) कडे आहे. अकलूजचे श्री. विठ्ठलशेट देशमाने, संगम येथील म्हणजे कंपनीच्या कार्यक्षेत्रांतील इनामदार श्री. शंकरराव विठ्ठलराव इनामदार संगमकर व सुप्रीम म्युच्युअलचे श्री. व. न. म्हैसूर इत्यादि संचालक मंडळांत आहेत. केंद्र कचेरीचा पत्ता पदे भुवन, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, पुणें ४ असा आहे.

## दि विजय टेक्स्टाइल्स लि. पुणें

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें २३ लक्ष रुपयांची विक्री करून ६,९१७ रु. निवळ नफा मिळविला. प्रेफरन्स व ऑर्डिनरी भागांस ६% डिव्हिडंड देण्यांत आलें. वार्षिक सभा २६ ऑक्टोबर रोजीं झाली.

## जरूर तर हुक्का ओढा, परंतु सिगारेट सोडा

सिगारेट ओढण्याचें सोडून द्या; त्याऐवजीं जरूर तर हुक्का ओढा, अशी विनंति नेपाळच्या पंतप्रधानांनीं नेपाळच्या प्रजाजनांस केली आहे. आयात होणाऱ्या सिगारेटसप्रीत्यर्थ नेपाळचा वार्षिक खर्च ६० लक्ष रु. आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,२२,८५० रु. |
| भरलेलें भांडवल | ७४,२७० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | १०,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. गांजकडून )

साप्ताहिक बंद भाव


| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मळ रु. | सोमवार २७।१०।४७ | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | सोमवार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१७८; २५२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १६५५ | | | | |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३४० | | | | |
| ६५; ३६-४ | ०-८-० | ऑगस्ट | बेंगॉल स्टील | १० | २५-१० | | | | |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३३-४ | | | | |
| ३९७-८; २१३२-८ | १२-८-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०३५ | | | | |
| ११८०; ६५८ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५५१ | | | | |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५७० | | | | |
| ५६७; ३९८ | ४-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २९० | | | | |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २८९ | | | | |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३१६ | | | | |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | | | | |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१४ | | | | |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-१४ | | | | |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ११-६ | | | | |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५५१-४ | | | | |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११८ | १५८-८ | | | | |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७१ | | | | |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८५ | | | | |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३४-१ | | | | |


-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




## साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें १.

## पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

पुणें सें. को. बँकेच्या सहकारी सप्ताहास रविवार, ता. २६ रोजीं प्रि. ध. रा. गाडगीळ ह्यांच्या, "शेतकऱ्याची सहकारी पत" ह्या विषयावरील व्याख्यानानें प्रारंभ झाला. सोमवार ता. २७ रोजीं श्री. दा. वि. गोखले हे "सावकारी नियंत्रण" ह्या विषयावर बोलले. मंगळवार ता. २८ रोजींच्या श्री. शं. रा. भागवत ह्यांच्या व्याख्यानाचा विषय, "प्रादेशिक सुधारणा व संघटना" हा होता. ता. २६, २७ व २८ रोजीं श्री. श्री. रा. पाळंदे, श्री. य. द. खोले व श्री. वा. के. जोशी ह्यांचीं अनुक्रमें पाटस, भिगवण व खरपुडी (खेड) येथें सहकारी विषयावर व्याख्यानें झालीं. ता. २८ रोजीं आळे (जुन्नर) येथें श्री. य. धों. ओगले हे गेले होते. बुधवार, ता. २९ ऑक्टोबर ते शनिवार ता. १ नोव्हेंबर अखेरच्या व्याख्यानांचा कार्यक्रम खाली दिला आहे.

पुणें सें. को. बँकेचा दिवाणखाना

रोज सायंकाळीं ६॥ वाजतां

| वार | तारीख | व्याख्याते | विषय |
|---|---|---|---|
| बुधवार | २९ | श्री. दा. वा. पोतदार | शेतकऱ्यांच्या पतीची पुनर्रचना |
| गुरुवार | ३० | श्री. श्री. वा. काळे | चालू आर्थिक परिस्थितीचें स्वरूप |
| शुक्रवार | ३१ | प्रा. स. वा. कोगेकर | सहकारी चळवळीचें भवितव्य |
| शनिवार | १ | श्री. कुं. सो. फिरोदिया | समारोप (वेळ सायंकाळीं ५॥) |

पुणें जिल्ह्यांतील कार्यक्रम

| वार | तारीख | स्थळ | व्याख्याते |
|---|---|---|---|
| बुधवार | २९ | निरा स्टेशन | श्री. य. द. खोले |
| गुरुवार | ३० | सासवड | श्री. द. सो. टिळेकर |
| शुक्रवार | ३१ | शिरूर (घोडनदी) | श्री. ग. र. तुळशीबागवाले |

**राधानगरी पेटा शेतकरी सहकारी बँक लि., सरवडे**

कोल्हापूर संस्थानापैकी राधानगरी पेट्यांतील शेतकऱ्यांनीं वरील संस्था नुकतीच सुरू केली आहे. तिचें अधिकृत भांडवल एक लाख रु. असून आतांपर्यंत खपलेलें भांडवल ५५ हजार रु. आहे. बँकेनें कामास नुकतीच सुरवात होऊन आतापर्यंत सभासद ५०७ झाले आहेत. राधानगरीसारख्या डोंगराळ भागांत शेतकऱ्यांनीं स्वावलंबी बनण्याचे दृष्टीनें सदर बँकेची आखलेली योजना हें करवीर इलाख्यांत पहिलेंच उदाहरण आहे. सदर बँक यशस्वी करण्याकरितां राधानगरी पेट्यांतील शेतकरी उत्साहानें भाग घेत आहेत. बँकेचे अध्यक्ष श्री. शिवाजी विठोजी खोराटे हे असून मॅनेजर हरी धोंडजी जाधव व खजिनदार श्री. सिताराम बाबाजी पाटील हे आहेत.

**हा पेट्रोल रेशनिंगचा परिणाम**—ब्रिटनमध्यें पेट्रोलचें वांटप किती काळ चालेल तें सांगता येत नाहीं. पेट्रोलचें वांटप झाल्यानें उत्पन्न झालेल्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिश कारखान्यांतून एक नवीन मोटार तयार करण्यांत आली आहे. ह्या गाडीला पेट्रोलचें व विजेचें अशीं दोन एंजिनें असतात. गाडीचा वेग ताशी ५० मैल असूं शकतो. फक्त पेट्रोलवर चालेल त्यावेळीं वेग ३५ मैलच येऊं शकेल.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड**

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली) ● स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेंक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५१


| | |
|---|---|
| वसूल भांडवल | २०,१४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २५,६५,००० रु. |

**खेळतें भांडवल ७ कोटी रुपयांवर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि वर्दे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.